सुरेश मेहता, आनंद सराफ, इक्बाल दरबार, शिरीष मोहिते, मंडळाचे अध्यक्ष विवेक खटावकर, राजेश दातार, समीर रुपदे उपस्थित होते.

अग्निशमन दलातील कर्मचारी आणि जीवरक्षकांचे कौतुक केले. रासने म्हणाले, 'कार्यकर्त्यांप्रमाणेच अग्निशमन दलातील कर्मचारी आणि जीवरक्षकांचेही

दुर्घटना घडल्या; परंतु पुण्यात एकही दुर्घटना घडली नाही, याचे सर्व श्रेय अग्निशामक दलाला आहे.'


के. जैन, बिशप्स हाउसचे व्हिकार जनरल फादर माल्कम सिक्वेरा, ऑर्नेलाज हायस्कूलचे प्राचार्य फादर

---

प्रा. शहाजी मोरे

# असे कर्मवीर होणे नाही

**अखंड दीनदुबळ्या गरीब जनतेच्या घरात शिक्षणाचा ज्ञानरूपी दीपक तेवत ठेवण्याचे महान कार्य ज्यांनी केले, त्या पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३२ वी जयंती नुकतीच साजरी झाली. त्यांच्याच अविरत मेहनतीतून साकारलेली रयत शिक्षण संस्था शताब्दी साजरी करीत आहे. त्यानिमित्त संस्थेच्या कार्याविषयी...**



स्वातंत्र्यापूर्वी भारताचे आणि त्यातही प्रकर्षाने महाराष्ट्राचे चित्र कल्पकतेने डोळ्यांसमोर आणल्यास कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांच्या कार्याची महती पटते. ज्या काळात शिक्षण ज्यांच्या गावीही नव्हते, त्या समाजाला शिक्षण मिळावे; म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अनंत हालअपेष्टा सहन करीत, घरचे सर्व धन (अगदी स्वतःच्या मुलीच्या हातातील सोन्याच्या बांगड्यासुद्धा) संस्थेच्या उभारणीसाठी कसलाही विचार न करता वापरल्या. त्यांच्या पत्नीने सौ. लक्ष्मीबाई पाटील यांनी तर मंगळसूत्रही संस्थेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सणासुदीच्या दिवशी उपाशी राहण्याची वेळ येऊ नये; म्हणून गहाण ठेवले. दंतकथाच म्हणावी लागेल असे हे औदार्य!

पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात त्या काळी वाहतुकीची कसलीही साधने नसताना गावोगावी डोंगरदऱ्यांतून, ऊनपावसात, अनवाणी पायांनी फिरून गरीब समाजातील, सर्व जाती-धर्मातील मुले गोळा करून, त्यांना स्वतःच्या मुलांपेक्षाही अधिक प्रेम देऊन, त्यांच्या शिक्षणाची सर्व व्यवस्था करणे, तेही १०० वर्षांपूर्वी म्हणजे काय दिव्य असेल... अशा मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःच सातारा जिल्ह्यातील काले या गावी ०४ ऑक्टोबर १९१९ रोजी

**निमित्त**

वसतिगृह सुरू करून, एका संस्थेची स्थापना केली. त्या संस्थेला 'रयत' हे अगदी समर्पक नाव दिले. रयत शिक्षण संस्था शताब्दी साजरी करीत आहे.

कर्मवीरांनी संस्थेचे बोधचिन्ह म्हणून वटवृक्षाची निवड केली. पुढे अण्णांनी 'रयत'च्या माध्यमातून आणखी वसतिगृहे उभारली. तेथे सर्व जाती-जमातींमधील, धर्मांतील मुले एकत्र जेवतात, राहतात. 'मला जे साबरमती आश्रमात जमले नाही, ते भाऊरावांनी प्रत्यक्षात करून दाखविले,' असे उद्‍गार महात्मा गांधी यांनीही त्या काळी काढले होते. कर्मवीर म्हणत, 'म्हणून नोकरी मागू नका, स्वतः कष्ट करा, उद्योग, व्यवसाय करा.' संस्थेचे ब्रीदच मुळी 'स्वावलंबी शिक्षण' हे आहे.

'रयत' आशियातील सर्वांत मोठी संस्था आहे. दीनदुबळ्या, अस्पृश्य समाजातील मुलांना शिक्षण देणारी संस्था म्हणून 'रयत'ची महाराष्ट्रास ओळख आहे. दर वर्षी रयत शिक्षण संस्थेत ५ लाख ते ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. काळानुसार संस्था बदलत आहे. जागतिकीकरण, खासगीकरण व संगणकीकरणाच्या युगात रयतचा विद्यार्थी समर्थपणे स्पर्धेला सामोरे जाऊन यशस्वी व्हावा, या हेतूने 'रयत'मध्ये प्रत्येक महाविद्यालयात विविध अभ्यासक्रम व प्रकल्प राबविले जातात. यात प्रामुख्याने संशोधन केंद्र, बी. पी. ओ. केंद्र, गुरुकुल प्रकल्प, नॉलेज बँक, भरतीपूर्व प्रशिक्षण, रयत प्रज्ञाशोध, दृकश्राव्य विभाग, स्पर्धा परीक्षा, प्रकाशन, रयत कौशल्य विकास, रयत प्लेसमेंट सेल इत्यादींचा समावेश आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या ४१ महाविद्यालयांपैकी ७ महाविद्यालयांना नॅक मार्फत 'ए प्लस' श्रेणी प्राप्त झाली आहे. जैन इरिगेशनच्या माध्यमातून रुकडी येथे १०० एकर शेती विकसित केली आहे व त्या ठिकाणी कृषी संशोधन प्रकल्प उभा केला आहे. राजीव गांधी सायन्स सेंटरची उभारणी केली आहे. सरकारने १०५ माध्यमिक विद्यालयांना 'अटल रिकरिंग लॅब'साठी प्रत्येकी २० लाख रुपये अनुदान मंजूर केले आहे. आज रयत शिक्षण संस्था एकूण ७५९ शाखांतून शिक्षण देत आहे. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास 'रयत'च्या उल्लेखशिवाय अपूर्णच आहे.

---

डॉ. शशांक शहा,
बॅरिॲट्रिक सर्जन

# बॅरिॲट्रिक सर्जरीचे फायदे



■ **बॅरिॲट्रिक शस्त्रक्रिया म्हणजे काय?**

बॅरिॲट्रिक / लठ्ठपणा निवारण शस्त्रक्रिया ही वजन कमी करण्याची शस्त्रक्रिया म्हणून ओळखली जाते. बॅरिॲट्रिक हा शब्द ग्रीक भाषेतून आला असून, याचा अर्थ वजन किंवा दाब असा आहे. या शस्त्रक्रियेमुळे त्या व्यक्तीचे खाणे कमी होते (उदा. गॅस्ट्रिक बँड, स्लीव्ह गॅस्ट्रोक्टॉमी) किंवा खाणे कमी होते व खाल्लेले अन्न शरीरात पूर्ण शोषले जात नाही (गॅस्ट्रिक बायपास).

■ **शस्त्रक्रियेच्या पात्रतेसाठी निकष**

■ आपले लिंग आणि उंची यानुसार जे योग्य वजन आहे, त्यापेक्षा ४५ किलो जास्त वजन.

■ बीएमआय (BMI) ३८.५ पेक्षा जास्त- आशियाई लोकांसाठी किंवा बीएमआय (BMI) ३३.५ पेक्षा जास्त आणि त्याबरोबर असणाऱ्या

**आरोग्यमंत्र**

शारीरिक तक्रारी उदा : मधुमेह, उच्च रक्तदाब, झोपेत श्वास बंद पडणे.

■ वजनामुळे असणाऱ्या इतर शारीरिक तक्रारी

■ मानसिक आजार नसणे / औषधांवर अवलंबून राहावे लागणारा इतर कोणताही आजार नसणे

■ रुग्ण शस्त्रक्रियेतील संभाव्य धोके समजून घेण्यास सक्षम असावा.

■ **बॅरिॲट्रिक सर्जरी का करावी?**

या शस्त्रक्रियेनंतर वजन कमी होण्याबरोबरच आरोग्यावर अनेक चांगले परिणाम होतात. वैज्ञानिक संशोधनात असे दिसून आले आहे, की लठ्ठपणा कमी करण्याच्या शस्त्रक्रियेनंतर आरोग्यविषयक समस्यांत लक्षणीय सुधारणा दिसते.

■ **ही शस्त्रक्रिया कशी कार्य करते?**

लठ्ठपणा निवारण शस्त्रक्रियेमुळे आपल्या शरीरात अन्नाद्वारे जाणारे उष्मांक नियंत्रित केले जातात. हे करण्यासाठी प्रतिबंध आणि अल्पशोषण या दोन पद्धतींचा अवलंब करता येतो.

■ **प्रतिबंध :** यात जठराचा आकार कमी केला जातो. त्यामुळे आहार कमी होतो आणि भूक लवकर शमते.

■ **प्रतिबंध व कुपोषण / अल्पशोषण :** यात जठराचा आकार कमी केला जातो. त्याबरोबरच लहान आतड्याचा मार्गही बदलला जातो. (Roux – en – Y Bypass). यामुळे आहार कमी होण्याबरोबरच शरीरात उष्मांक शोषले जाण्याचे प्रमाणही कमी होते.

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA
PIMPRI, PUNE-17

+ CMYK